# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


**तात्काळ/कालमर्यादित**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१९/ ६३३

दिनांक :- 16 FEB 2019

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद,

पु.ला.लातूर, बीड, जालना, अंबड, जिंतूर.

**विषय : _ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षातील बांधकामावर झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणेबाबत...**

संदर्भ : १) शासन पत्र क्र. बांनिधी-१२१८/प्र.क्र.८४/१८/तांशि-३ दिनांक १९/१२/२०१८

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई यांचे पत्र क्र. ९(२)/नियोजन/२०१९/५० दि.११/०२/२०१९

उपरोक्त विषयाबाबत शासनाच्या संदर्भीय पत्रान्वये शासनाने कळविले आहे की, सन २०१७-१८ मधील खर्चाचे बांधकामनिहाय उपयोगिता प्रमाणपत्रे GFR-12-C या नमुन्यात सबंधित बांधकाम विभागाकडून घेऊन सादर करावीत. जेणेकरुन मार्च-२०१८ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात सन २०१८-१९ साठी कामनिहाय अर्थसंकल्पित झालेला निधी शासनाकडून वितरीत करण्यात येईल व तो विहित वेळेत खर्च होऊ शकेल. याबाबत वारंवार पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. तसेच दूरध्वनीवरुन सुचना देऊनही उपयोगिता प्रमाणेपत्रे सादर करण्यात आलेली नाहीत.

शासनाने याबाबत नमूद केलेले आहे की, मागील वर्षातील (सन २०१७-१८) बांधकानिहाय उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केल्याशिवाय सन २०१८-१९ मधील सदर कामावरील निधी वितरीत केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच पुढील वर्षासाठी (सन २०१९-२०) सदर काम अर्थसंकल्पातून वगळण्यात येईल. त्याची सर्व जबाबदारी सबंधित प्राचार्य व सबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग यांची असेल. करिता उपरोक्त शासकीय संस्थानी उपयोगिता प्रमाणपत्रे तात्काळ या कार्यालयास सादर करावीत.

सोबत : संदर्भिय शासन पत्राची प्रत

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत: १ मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२ या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

पत्र प्राप्ती शाखा
२४ … 2018
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

महाराष्ट्र शासन

क्र.बांनिधी-१२१८/प्र.क्र.८४/१८/तांशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक :-१९ डिसेंबर, २०१८

प्रति,
आं.वि.स.तथा सहसचिव,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
मंत्रालय, मुंबई.

शा. ३३६१
२७/१२/१८

विषय :- सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील मार्च-२०१८ च्या अधिवेशनात अर्थसंकल्पित झालेला निधी वितरीत करणेकरीता मागील वर्षी उपलब्ध करून दिलेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करणेबाबत...

संदर्भ:- समक्रमांकाची दि.८ मे, व ४ ऑगस्ट व दिं.१ सप्टेंबर, २०१८ ची पत्रे.

महोदय,

वित्त विभागाच्या दि.२ एप्रिल, २०१८ च्या परिपत्रकातील सूचना विचारात घेता, सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील मार्च-२०१८ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनात तंत्रशिक्षण संचालनायांतर्गत विविध संस्थांच्या बांधकामासाठी अर्थसंकल्पित झालेला निधी वितरीत करण्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण यांना संदर्भाधीन दि.८ मे, व दि.४ ऑगस्ट, २०१८ च्या पत्रान्वये उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच आपणांस दि.१ सप्टेंबर, २०१८ च्या पत्रान्वये मागील आर्थिक वर्षाचे खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याकरीता संबधितांना सूचना देण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि, या पत्रासोबत जोडलेल्या यादीनुसार एकूण ३९ संस्थांपैकी २२ संस्थांनी खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केली असुन त्या संस्थांना निधी वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित १७ संस्थांची उपयोगिता प्रमाणपत्रे अद्याप अप्राप्त असल्यामुळे, त्या संस्थांना निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

२. याबाबत आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या अधिनस्थ असलेल्या सार्वजनिक बांधकाम मंडळातील संबंधिताना ज्या संस्थांनी बांधकाम निधीचे मागील वर्षातील खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर केलेली नाहीत, त्यांना संबंधित संस्थांमार्फत संचालक, तंत्रशिक्षण यांना उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत पुन्हा सूचना देण्यात याव्यात. जेणेकरुन सदर निधी संबंधित संस्थांना वितरीत करता येईल व तो विहित वेळेत खर्च होऊ शकेल. अन्यथा सदरचा निधी अखर्चित राहील्यास, महालेखापाल कार्यालयाकडून आक्षेप उपस्थित केले जाऊ शकतात.

३. याबाबत नमूद करण्यात येते की, वित्त विभागाने वार्षिक कार्यक्रम २०१८-१९ करीता डिसेंबर-२०१८ पर्यंत अर्थसंकल्पित निधीच्या ७० टक्के तरतूद वितरीत करण्यास मंजूरी दिलेली आहे. तथापि, चालू आर्थिक वर्षाचा शिल्लक असलेला ३ महिन्यांचा कालावधी विचारात घेता, मंजूर निधी विहित वेळेत वितरीत करुन तो खर्च होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सदरचा अर्थसंकल्पित निधी अखर्चीत राहील्यास, त्याची जबाबदारी या विभागाची नसून त्यास संबंधित सार्वजनिक बांधकाम मंडळे जबाबदार असतील.

आपली,

(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मुंबई यांनी अधिनस्त सर्व संस्थांना सहसचालंकामार्फत उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत त्वरीत सूचना द्याव्यात.